N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** रिसोड **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0504 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/09/2022 20:32 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 14/09/2022

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/09/2022

**Time From (वेळेपासून):** 13:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/09/2022 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 027 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/09/2022 20:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महालक्ष्मी वसाहत निजामपुर,रिसोड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रामेश्वर परसराम राठोड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मांडवा,रिसोड,रिसोड ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मांडवा,रिसोड,रिसोड ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9075120306

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रेमानंद शामराव मनवर | | | 1. शाहपुर,मंगरुळपीर,मंगरूळपीर,वाशिम, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकीकतः- फिर्याद रिसोड दिनांकः-14.09.2022माझे नांव - रामेश्वर परसराम राठोड वय-31 वर्श, व्यवसाय-शेती रा.मांडवा,ता.रिसोड जि.वाषिम मो.नं.9075120306.मी कुटूंबासह वरिल ठिकाणी राहतो व षेती करतो.दिनांक 08.09.2022 रोजी मी अन्टी करप्शन ब्युरो कार्यालय वाशिम येथे येऊन पोलीस उपअधिक्षक श्री.शेळके यांचेकडे माझी लाच मागणी बाबत तक्रार सांगितली व कार्यवाही करीता दि. 09.09.2022 रोजी रिसोड येथे येण्याबाबत विनंती केली.दिनांक 09.09.2022 रोजी पोलीस उपअधिक्षक शेळके, स्टाफ शासकिय पंचासह असे शासकिय वाहनाने वाशिम रिसोड रोडवरील संत कबीर कुटी येथे आले. तिथे त्यांचेसोबत माझी व माझा मित्र विजय चव्हाण यांची भेट झाली. मी माझी तक्रार पंचां समोर सांगितली. पोलीस उपअधिक्षक शेळके यांचे सुचनेवरुन मी माझी लेखी तक्रार स्वःहस्ताक्षरात लिहुन दिली मी समक्ष येऊन तक्रार देतो कि, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो. माझेकडे मांडवा शेत शिवारात 2 एकर शेती वडीलांचे नावावर असुन सदर शेती मी मागील तीन वर्षापासुन करतो.माझे वडील परसराम माना राठोड यांचे नावावर मांडवा गावात 33 बाय 33 फुट जागेवर घर बांधलेले आहे.मला फायनान्स कडुन कर्ज घ्यायचे आहे. त्यामुळे त्या 33 बाय 33 फुट जागेपैकी साडे सोळा बाय 33 फुट जागा बांधकामासह ही माझे वडील परसराम माना राठोड यांचे नावावरुन कमी करुन माझे नावे ग्रामपंचायत मांडवा येथे नोंद करायची आहे. त्या करीता मी आमचे मांडवा गावचे ग्रामसेवक श्री.मनवर साहेब यांना दिनांक 06.09.2022 रोजी पंचायत समिती कार्यालय रिसोड येथे भेटलो होतो. तेंव्हा त्यांनी मला माझे नावे जागेची बांधकामासह नोंद करण्याकरीता वडीलांचे नावाचा 1 शंभर रुपयाचा बंड पेपरवर सेतु मधून नोंद करण्याकरीता चा प्रतिज्ञालेख व वडीलांचा विनंती अर्ज तसेच 6000/-रु मागीतले. मी त्यांना 6000/-रु कशाकरीता लागतात. तर श्री.मनवर साहेब ग्रामसेवक यांनी तुझ्यावडीलांचे नावावरुन तुझे नावाची नोंद करायची असेल तर मला 6000/-रु दयावे लागतील तरच तुझ्या नावाची नोंद ग्रामपंचायत ला होईल असे सांगीतले. ग्रामपंचायत मध्ये जागेची नोंद करण्याकरीता फि लागत नाही.श्री.मनवर साहेब ग्रामसेवक यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुश्मनी नाही. श्री.मनवर साहेब ग्रामसेवक मांडवा यांना लाच देण्याची माझी इच्छा नाही. त्यांच्यावर कारवाही करावी या करीता तक्रार देत आहे.कारवाही होण्यास विनंती आहे.पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी मला पडताळणी कार्यवाही बाबत, तसेच मेमरी कार्ड व व्हाईस रेकर्डर चे कार्यप्रणाली बाबत माहिती समजावून सांगितली. सदर तक्रारीवरुन दि.09.09.2022 रोजी मला,माझा मित्र विजय चव्हाण व पंच क्र.1 सह बस स्टण्ड रिसाडचे मागचे बाजुस महाराष्ट्र बकेच्या बाजुला असलेल्या ग्राहक सेवा केंद्र येथे ग्रामसेवक श्री. मनवर यांचे भेटीकरीता व्हाईस रेकर्डर लावुन पाठवून पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. व्हाईस रेकर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये आमच्या भेटी दरम्यानचे संभाषण रेकार्ड झाले आहे. महाराष्ट्र बकेच्या बाजुला असलेल्या ग्राहक सेवा केंद्र येथे ग्रामसेवक मनवर साहेब यांची भेट घेऊन तिथे कागदपत्रे ऑनलाईन करण्याकरीता देवुन तेथुन आम्ही बाजुला असलेल्या हटेल संतोश येथे जावुन चहा घेतला. तिथे माझी, माझा मित्र

विजय चव्हाण व ग्रामसेवक मनवर यांचे मध्ये आमच्यामध्ये कामासंबंधाने बोलनी केली.मी मनवर साहेब यांना म्हटले कि, वडील....वडीलांच्या नावाची हे तिकड.. माझ्या नावावर आर्धी करायची असे म्हटले असता मनवर साहेब यांनी मला तेच दाखवं नअसे म्हटले. मी त्याना हो तेच ते दाखवतो...परसराम माना राठोड..महिंद्रा फायनान्स करायचं ते असे म्हटले असता मनवर ग्रामसेवक यांनी मला हो हो करा नं हो फायनान्स कोनतं करायचं ते..सरपंच असल्यावर काय फिकीर करुन टाका.. बाबाची तुमच्या नावानं.. सोळा बाय.... असे म्हटले. मी त्यांना तेहतीस हाय.. असे म्हटले. असता मनवर साहेब यांनी मला तुमच्या नावानं केली येवढया पैकी असे म्हटले. मी त्यांना हो अर्धा असे म्हटले. असता त्यांनी मला तेहतीस पैकी..एक हजार एकोन्नवद होती त्याच्यापैकी ऐवढी केली असे म्हटले. तसेच त्यांनी मला अरे दयानं ते माहया सरपंचा जवड दयानं त्यालं दया लागते तं..तुमच्या देखतंच बोलला ते..असे म्हटले असता मी ग्रामसेवक मनवर यांना तुम्हालं किती.... असे म्हटले असता त्यांनी मला अरे सहा म्हटल्यावर...नाही नाही म्हटलं त दया असे म्हटले असता माझा मित्र विजय चव्हाण यांनी मनवर साहेब यांना किती? बराबर सांगानं गरीब मानंस हेत.. असे म्हटले. मी मनवर साहेब यांना माझं सांगा हो असे म्हटले असता मनवर साहेब यांनी मला एकटयाचं काय मंग जाउ देनं..मंग जाया पुरते दया   आता पाच दया मंग असे म्हटले. मित्र विजय चव्हाण यांनी पाच हजार असे म्हटले असता मनवर साहेबांनी हो.. हायेत किती असे म्हटले. मी मनवर साहेब यांना मी तुम्हालं सोमवारी...सोमवारी किंवा मंगळवारी पैसे देतो असे म्हटले असता मनवर साहेब यांनी मला मी ईथी कष्यासाठी आलो राजा पाचशे रुपये माहे खर्च झाले राजा.. नाही त आज काहीच काम नव्हत कालंच मिटींग झाली असे म्हटले.असता मित्र विजय चव्हाण यांनी हजार रुपये करा बाकीचे सोमवार किंवा मंळवारी करा. असे म्हटले असता मनवर साहेब यांनी साहेब मले कमीत कमी दोन हजार तरी करा..माहा कमीत कमी फायदा झाला पाहीजे इथंपर्यंत यायचा असे म्हटले. मी मनवर साहेब यांना सोमवारी देतो नं सर.. सोमवारी किंवा मंगळवारी असे म्हटले असता त्यंानी मला आज मले दोन हजार दे असे म्हटले असता मित्र विजय चव्हाण यांनी मी काय म्हणतो आता सोमवारी नाहीतं मंगळवारी..ते पाच हजार रुपये देतील ते... सदया हजार देतील.. असे म्हटले.असता मी माझे जवळील 1000/-रु रु मनवर साहेब यांना दिले.तर मनवर साहेब यांनी मला आता हे मलं हजार रुपये देले..आता मलं पाच हजार रुपये सोमवारी देसाल असे म्हणुन 6000/-रु लाचेची मागणी करुन पडताळणी दरम्यान 1000/-रु स्विकारले. उर्वरीत 5000/-रु सोमवारी स्विकारण्याची तयारी दर्शविली.त्यांनतर तेथुन संत कबीर कुटी रिसोड येथे परत आलो. सोमवार दिनांक 12.09.2022 रोजी राहीलेले 5000/-रु देण्याचे ठरल्याने सापळा कारवाई सोमवार दि.12.09.2022 रोजी करण्याचे ठरल्याने.त्यांनतर पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी ला.प्र.वि.कार्यालय वाशिम येथु जावुन पंचनामा केला.दि. 12.09.2022 रोजी सापळा कारवाई करण्याकरीता पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी मला संपर्क केला असता मी त्यांना सांगीतले कि,मित्र विजय चव्हाण यांनी ग्रामसेवक मनवर यांना मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी सागीतले कि,काल रात्री पासुन सतत पाऊस सुरु असल्यामुळे आज रिसोड येथे येणार नाहीत.उदया रिसोड येतो असे कळविले आहे. त्यामुळे सापळा कारवाई करीता आज येऊ नका असे सांगीतले. पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी ला.प्र.वि.कार्यालय वाशिम येथे तसा पंचनामा केला.दि.13.09.2022 रोजी मी संपर्क केल्यावरुन पोलीस उपअधिक्षक शेळके,पंच व त्यांचा स्टाफ सोबत संत कबीर कुटी रिसोड येथे माझी व माझा मित्र विजय चव्हाण यांचेसोबत भेट झाली. पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी मला खाजगी वाहनात बसवून घेवून पोलीस उपअधिक्षक शेळके साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे मी ग्रामसेवक मनवर यांना लाच म्हणुन देण्याकरीता 5,000/-रूपये रक्कम हजर केली. त्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी सापळा कार्यवाही संबंधी मला,पंच व स्टाफ ला सुचना दिल्या. अँल्ट्राव्हायोलेट लम्पचा प्रयोग करून दाखविले. पोलीस उपअधिक्षक शेळके यांचे सुचनेवरुन माझा मित्र. विजय चव्हाण याने ग्रामसेवक मनवर यांना संपर्क केला असता ग्रामसेवक मनवर यानी सांगीतले कि, त्यांची तब्येत चांगली नसल्यामुळे ते आज रिसोड येथे आले नाहीत. उदया रिसोड येथे येतो असे सांगीतल्याने दि.13.09.2022 रोजीची सापळा कारवाई स्थगीत ठेवण्यात आली.तसेच ग्रामसेवक मनवर यांना लाच कामी देणेकरीता असलेली रक्कम 5000/-रु पोउपअधिक्षक शेळके यांनी कागदामध्ये गुंडाळुन प्लास्टिकचे पकिटामध्ये सुरक्षीत स्वतःजवळ ठेवली. त्यांनतर पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी ला.प्र.वि.कार्यालय वाशिम येथे जावुन सापळा पुर्व पंचनामा केला.      दि.14.09.2022 रोजी मी संपर्क केल्यावरुन पोलीस उपअधिक्षक शेळके,पंच व त्यांचा स्टाफ सोबत संत कबीर कुटी रिसोड येथे माझी व माझा मित्र विजय चव्हाण यांचेसोबत सापळा कारवाई करीता भेट झाली. पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी मला खाजगी वाहनात बसवून घेवून ग्रामसेवक मनवर यांना लाच कामी देणेकरीता असलेली रक्कम 5000/-रु सुरक्षीत स्वतःजवळ ठेवलेली पोहवा विनोद अवगळे यांचे जवळ दिली. त्यांनी माझे फुलपन्टचे समोरील खिशात ग्रामसेवक मनवर यांना लाच म्हणुन देण्याकरीता 5,000/-रूपये ठेवले. पोउपअधिक्षक शेळके यांनी मला व पंच व स्टाफला सापळा पुर्व पंचनामातील सुचनांची उजळणी करुन दिली.त्यानंतर माझे जवळ व्हाईस रेकर्डर सुरु करुन देवुन ग्रामसेवक प्रेमानंद मनवर साहेब हे भाडयाने राहत असलेल्या रिसोड ते हिंगोली रोडवरील खोलीवर भेटणार असल्याने मला, पंच क्र.1 व माझा मित्र विजय चव्हाण यांचेसह ग्रामसेवक प्रेमानंद मनवर यांचे भेटीकरीता पाठवून ग्रामसेवक प्रेमानंद मनवर साहेब हे भाडयाने राहत असलेल्या रिसोड ते हिंगोली रोडवरील खोलीचे आजुबाजुला  सापळा कारवाई आयोजीत करण्यात आली. ग्रामसेवक प्रेमानंद मनवर साहेब यांचे भेटी दरम्यान मी ग्रामसेवक मनवर साहेब यांना नमस्कार मनवर साहेब...असे म्हटले.ग्रामसेवक मनवर यांनी मला बसा नं हो जय सेवालाल म्हणा असे म्हटले. मी ग्रामसेवक मनवर साहेब...यांना झाली का आपली घराची नोंद असे म्हटले. मनवर साहेब यांनी मला झाली.. म्हणुन असे सांगीतले. मी मनवर ग्रामसेवक यांना मी गेलतो तिकडं झालीच नाही असे म्हटले. मनवर साहेब यांनी मला काय लावलं त्याहनं असे म्हटले. मी मनवर साहेब यांना पैसे दयायचे काय असे म्हटले असता मनवर साहेब यांनी मला म्हटले पाच हजार रूपये त्याच दिवशी सांगीतलं... असे म्हटले असता मी ग्रामसेवक मनवर साहेब यांना बरं बरं त्या दिवशी एक हजार रूपये देलते असे म्हटले. ग्रामसेवक मनवर यांनी मला दोन तं त्याले दयाचं लागीलं  असे म्हटले. मी ग्रामसेवक मनवर यांना बरं बरं ठिक हे पाच हजार देलेत हं...असे म्हटले असता ग्रामसेवक मनवर यांनी हो असे म्हणुन माझे जवळुन ग्रामसेवक मनवर यांनी 5000/-रु लाचेची रक्कम स्विकारली अंगात घातलेल्या फुलपन्टच्या उजवे बाजुचे खिष्यात ठेवली. त्यानंतर मी, माझे खिशातुन रुमाल काढुन तोंड पुसून लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित ईशारा केला,दिनांक 09.09.2022 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान ग्रामसेवक प्रेमानंद मनवर यांनी रिसोड येथिल संतोष हटेलमध्ये माझे वडील परसराम माना राठोड यांचे नावावर असलेले गावातील 33 बाय 33 फुट जागा घराचे बांधकामासह जागेपैकी साडेसोळा बाय 33 फुट जागेची बांधकामासह नोंद माझे नांवे ग्रामपंचायत मांडवा येथे करण्याकरीता मला 6000/-रुपये लाचेची मागणी करुन पडताळणी दरम्यान माझेकडुन 1000/-रु घेवुन दिनांक 14.09.2022 रोजी सापळा कारवाई दरम्यान ग्रामसेवक प्रेमानंद मनवर यांनी माझे कडुन उर्वरीत लाचेची रक्कम 5,000/-रु  महालक्ष्मी वसाहत,निजामपुर फाटा,हिंगोली रोड रिसोड येथील श्री.निखील खके यांची ग्रामसेवक प्रेमानंद मनवर यांनी भाडयाने घेतलेली खोली येथे स्विकारले. म्हणुन माझी प्रेमानंद शामराव मनवर,वय 45 वर्ष ग्रामसेवक ग्रामपंचायत मांडवा,रा.शहापुर,मंगरुळपीर, ता.मंगरुळपीर, जि.वाशिम यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद पो.ना.योगेश खोटे यांनी टंकलिखीत केली असुन मला वाचुन दाखविली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.     समक्ष    सही       (गजानन आर शेळके)  (रामेश्वर परसराम राठोड )       पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.अशा लेखी फिर्याद वरुन  सदरचा गुन्हा दाखल करुन पुढील तपास  पोलीस उपअधिक्षक शेळके लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांचे कडे देण्यात आला.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): MEENABAI Uttamarao PATHARKAR
**Rank** (पद): HC (Head Constable)
**No.**(क्र.): POBN64269 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

UHC Patharkar

For **Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): Devendrasinh Bahadursinh
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):